**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१७०-२०१६**

## नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६

## निशाणी क्र. ९९ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र.४ब यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदरहू दावा वादीने वाटपाकरिता दाखल केलेला असून सदरहू दाव्याचे कामातील प्रतिवादी क्र.४ब माधवी मंगेश कांदळकर पुर्वाश्रमीची काशिबाई लवू पाटकर ही दि.१५/०४/२०२४ रोजी मयत झाली आहे. सदरहू दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.४ब चे वारस आवश्यक पक्षकार असून त्यांना या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक व जरुरीचे आहे. तरी त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जात नमुद कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, नि.क्र. ९८ येथे मयत प्रतिवादी क्र.४ब माधवी मंगेश कांदळकर यांचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.४ब या मयत असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाबाबतचे नमुद कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये १००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.४ब यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.03 18:14:18 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०१/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.